# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 10/02/2020 (सोमवार)
## (सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत मौजा पिंपळगाव वखाजी येथे दिनांक 08/02/2020 चे 10:30 वा. ते 18:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुरेंद्र संतोषराव लक्ष्मणकर, वय 41 वर्ष, रा. वार्ड क्र. 1, विठ्ठल मंदीरजवळ पिंपळगाव, वखाजी यांच्या घरी कोणी हजर नसतांनी अज्ञात आरोपीने घरात प्रवेश केले. तसेच आरोपीने फिर्यादींचे घरामधील लोखंडी कपाटात ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने कि. 12,750/–रू. ची चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक दातात्रीय कोलटे 8805448417 हे करीत आहे.

### दुखापत

पो.स्टे. पारशिवनी :– दिनांक 09/02/2020 चे 00.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रोशन जिवन बंधाटे, वय 28 वर्ष, रा. हमलापुरी, ह. मु. आमडी फाटा गडेचा ढाबा हे गडे ढाबाचे देखरेखीचे काम पाहत होते. दरम्यान आरोपी क्र. 1) दिनेश यादव व त्याचे दोन मित्रांनी फिर्यादीस मटन चिकन मागीतले असता फिर्यादीने संपल्याचे सांगीतले, यावरून फिर्यादीला आरोपीतांनी शिवीगाळ केली. तसेच आरोपीतांनी त्यांच्या किचन मध्ये जावुन फिर्यादीस हातबुक्याने मारहाण केली. यानंतर आरोपीतांनी फिर्यादीस पुन्हा मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नरेश रामटेके 9890100715 हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. सावनेर :– दिनांक 08/02/2020 चे 21.30 वा. दरम्यान 46 वर्षीय फिर्यादी/पीडित या शेकोटी पेटवून हात शेकत असतांना आरोपी नामे– आकाश रंगारी, रा. बजाज कॉलनी, क्वॉटर क्र. 5/8 सावनेर याने कुत्र्याला वर खाली करून जमीनीवर पटकले असता फिर्यादींचा मुलगा प्रशांतने आरोपीस हटकले असता त्यास आरोपीने हातबुक्कीने मारहाण केली. फिर्यादी सोडविण्यास गेल्या असता आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 294, 506 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार पांडे 7350055669 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर